## उलटतपास जाबदेणारतर्फे विधीज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांच्यामार्फत शपथेवर

५. अर्जदार व जाब देणार यांच्या पुर्वीच्या प्रकरणामध्ये माझ्याकडे कुलमुखत्यारपत्र होते. अर्जदार व जाबदेणार यांच्या संबंधात मी न्यायालयात प्रथम सन २०१२ मध्ये आलो. हे म्हणणे खरे नाही की त्यापुर्वीचे मला काहीही माहिती नाही. न्यायालयात पुर्वी त्यांच्यादरम्यान कपांउंड बांधल्याच्याबाबत कामकाज चालू होते. कंपाउंडबाबत निश्चित काय होते ते मला माहीत नाही.

६. गोवेकर वकिलांनी मला न्यायालयात येण्याची आवश्यकता नाही असे सन २०१० मध्ये सांगितले होते. मी त्याची निश्चित तारीख व महिना सांगू शकत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे गोवेकर वकिलांनी मला सांगितल्यानंतर मी न्यायालयात उपस्थित राहिलो नाही. माझी केस पुर्वी गोवेकर वकील यांच्याकडे होती. गोवेकर वकिलांनी मला चुकीचे मार्गदर्शन केले म्हणून माझा अर्ज डिस्मीस झाला असे माझे म्हणणे आहे. त्यामुळे मला माझ्या बहिणीचा ओरडा खावा लागला हे माझे नुकसान झाले. त्या व्यतिरिक्त माझे काहीही नुकसान झालेले नाही.

७. माझा मुळ अर्ज हा कपांउंड अतिक्रमण केल्याबाबतचा होता. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वकिलांनी जे तयार केले त्यावर मी फक्त सही केली व त्यात काय लिहिले आहे ते मला माहीत नाही. गोवेकर वकिलांनी मला नेहमीच हजर राहण्याची आवश्यकता नाही असे सांगितल्यावर मी पुन्हा त्यांना किती दिवसांनी भेटलो ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की वकिलांनी मला गैरहजर राहण्यास सांगितले नव्हते मात्र मी स्वतः सतत गैरहजर राहिलो. हे म्हणणे खरे आहे की गोवेकर वकिलांनी मला गैरहजर राहण्याबाबत सांगितल्याबाबत माझ्याकडे माझ्या शब्दाशिवाय दुसरा पुरावा नाही. मी गोवेकर वकिलांबाबत कोठेही लेखी तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की माझा अर्ज पुनर्प्रस्थापित करण्यासाठी झालेला उशिर माफ करण्यासाठी गोवेकर वकिलांचे नाव मध्ये घातलेले आहे. माझ्या बहिणीचा फोन दि.

२७/०४/२०१२ रोजी आला हे दाखविणारा पुरावा मी न्यायालयात हजर करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. २७/०४/२०१२ रोजीचे कारण मी लबाडीने तयार केलेले आहे. सन २०१२ मध्ये मी माझ्या वकिलांशी संपर्क साधला हे दाखविणारा पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०३/२००९ हा साक्षीदार सतत गैरहजर राहिल्यामुळे खारीज झालेला असून तो पुनर्प्रस्थापित करण्यासाठी झालेला उशिर कदापी माफ होण्यासारखा नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दाखल केलेला अर्ज लबाडीचा असून माझे प्रतिज्ञापत्र देखील लबाडीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जात नमूद केल्याप्रमाणे माझे बहीण आजारी आहे व ती येवू शकत नाही अशी कोणतीही परिस्थिती नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र खोटे आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2019.10.07 16:23:16 +0530

दि. ०७/१०/२०१९ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायालय क.स्तर